SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./ No 1475 दि. 17 SEP 2026

# परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२७-२८ या वर्षापासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देणेबाबत...

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. मान्यता-२०२६/ई-७९९६८८/मशि/४, दिनांक २७/८/२०२६.

२. दिनांक ११/९/२०२६ रोजीची वर्तमानपत्रामधील जाहिरात.

३. मा.कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे संदर्भ क्र.मान्यता-२०२६/ई-७९९६८८/मशि-४, दि.१५.०९.२०२६ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २७/०८/२०२६ च्या पत्रानुसार दैनिक पुढारी, सकाळ व लोकमत (कोल्हापूर, सांगली, सातारा आवृत्ती) व दैनिक ऐक्य (सातारा आवृत्ती) या वर्तमान पत्रामधून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयामध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र विद्याशाखा, नवीन अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव कायम विनाअनुदानित तत्वावर ऑनलाईन पध्दतीत दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत सादर करावे असे कळविण्यात आले होते.

तथापि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १५/०९/२०२६ च्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी समाजकार्य अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना तयार करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. तेंव्हा शासनाकडून पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत समाजकार्य अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देणे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येवू नये, असे कळविले आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

श्री दिपक द. अडगळे
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

D:\NTW & BSP\Shasan T. 2026\Circular 2025.Docx

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक 418, चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-32.

**Email ID:mashi4-hted@mah.gov.in -**

क्रमांक : मान्यता-2026/ई-799688/मशि-4 दिनांकः स्वाक्षरीप्रमाणे

प्रति,

कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषयः** शैक्षणिक वर्ष 2027-28 पासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देणेबाबत.

**संदर्भः** शासन निर्णय क्र. मान्यता-2026/ई-799688/मशि-4, दिनांक 27.08.2026 .

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, सन 2027-28 या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार 'समाजकार्य' अशी स्वतंत्र विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच, अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी कायम विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यासंदर्भात शासन निर्णय दि.27.08.2026 अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापि, वारीलप्रमाणे मान्यता देताना समाजकार्य अभ्यासक्रमाची अनियंत्रित वाढ (Mushroom Growth) होऊ नये याकरिता शैक्षणिक वर्ष 2027-28 साठी समाजकार्य अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना तयार करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. सबब, शासनाकडून पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत समाजकार्य अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देणेअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये.

Digitally signed by
Jayshree Jaideep Pawar
Date: 15-09-2026
11:15:15

(जयश्री पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन